# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
E-mail : desk10@dtemaharashtra.gov.in Internet : http://www.dtemaharashtra.gov.in


इमेलद्वारे/तात्काळ

जा.क्र.१०/एनजीपी/शिवभोजन योजना/२०२०/ २८
दिनांक : 10 JAN 2020

प्रति,
संचालक / प्राचार्य,
शासकीय, अशासकीय अनुदानित, विद्यापीठ व्यवस्थापित, विनाअनुदानित
हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरींग टेक्नॉलॉजी पदविका / पदवी संस्था

विषय : गरीब व गरजू व्यक्तिंना स्वस्त दरात "शिवभोजन" उपलब्ध करुन देण्याबाबत
संदर्भ : १.शासन परिपत्रक क्र.शाभोथा-२०१९/प्र.क्र.५१/नापु-१७, दि.६ जानेवारी २०२०.
२.शासन पत्र क्र. संकीर्ण-१११२०/प्र.क्र.१४/२०/तांशि-७, दि. १० जानेवारी, २०२०

उपरोक्त विषयाबाबतचे संदर्भाधीन शासन परिपत्रक पत्र पहावे. प्रत सोबत जोडली आहे.

सदर पत्रांन्वये शासनामार्फत दि.२६ जानेवारी २०२० रोजीपासून राज्यातील गरीब व गरजू जनतेला सवलतीच्या दरात शिवभोजन उपलब्ध करून देण्याची योजना अंमलात आणण्यात येणार आहे. सदर योजनेची पूर्वतयारी करण्यासाठी शासनाने संदर्भाधीन परिपत्रकान्वये वेळापत्रक जाहिर केलेले आहे. सदर वेळापत्रकानुसार भोजनालय चालकांसाठी विविध विभागांच्या क्षेत्रिय अधिकाऱ्यांमार्फत त्या-त्या जिल्हयात दि.१३ ते १८ जानेवारी २०२० या कालावधीत एका दिवसाचे प्रशिक्षण आयोजित केलेले आहे.

उपरोक्त योजना सुरळीतपणे राबविण्यासाठी व अंमलात आणण्यासाठी आपल्या संस्थेतील प्राध्यापकांना रुचकर, स्वच्छ स्वयंपाक बनविण्याच्या अनुषंगाने स्थानिक समित्यांनी प्रशिक्षणासाठी निमंत्रित केलेल्या भोजनालय चालकांसाठी प्रशिक्षण आयोजित करण्याचे कार्य नेमूण देण्यात आलेले आहे.

त्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, आपल्या जिल्ह्याच्या जिल्हा पुरवठा अधिकारी किंवा अन्नधान्य वितरण अधिकारी यांच्याशी संपर्क साधून प्रशिक्षण कार्यक्रमाची रुपरेषा ठरविण्यात यावी व सदर प्रशिक्षण कार्यक्रमाचा कालावधी दि. १३.१.२०२० ते दि. १८.१.२०२० असा असल्याने त्यावर तात्काळ कार्यवाही करुन अनुपालन अहवाल या संचालनालयास सादर करावा.

(डॉ. अभय वाघ)
संचालक,
तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबई

पृष्ठांकन क्र./तशिरस/विकाना/शैवि/2020 183
दिनांक:- 13 JAN 2020

प्रति,
प्राचार्य,
शासकीय, अशासकीय अनुदानित,विद्यापीठ व्यस्थापित,विनाअनुदानित
हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरींग टेक्नॉलॉजी पदविका/ पदवी संस्था,
नागपूर विभाग नागपूर.

उपरोक्त पत्रात नमुद केल्या प्रमाणे संबंधित संस्थानी कार्यवाही करुन अनुपालन अहवाल संचालनालयास सादर करावा.

(डॉ.राम निबुदे)
प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,नागपूर

महाराष्ट्र शासन

क्रमांक- शाभोथा २०१९/प्र.क्र. ५१/नापु-१७
अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय (विस्तार) मुंबई-४०००३२
दिनांक : ०९ जानेवारी, २०२०.

प्रति,

उपसचिव (आस्थापना),
वैद्यकीय शिक्षण विभाग (अन्न व औषध प्रशासन)
नगर विकास विभाग.
सार्वजनिक आरोग्य विभाग
उच्च व तंत्र शिक्षण विभाग.

विषय :- गरीब व गरजू व्यक्तिंना स्वस्त दरात "शिवभोजन" उपलब्ध करुन देण्याबाबत.
संदर्भ :- शासन परिपत्रक क्र शाभोथा-२०१९/प्र.क्र.५१/नापु१७,दि.०६ जानेवारी,२०२०.

महोदय,

उपरोक्त संदर्भाधिय परिपत्रक सोबत जोडून पाठविले आहे. सदर विषयानुषंगाने भोजनालय चालकांसाठी विविध विभागाच्या क्षेत्रिय अधिका-यांमार्फत त्या-त्या जिल्ह्यांत दि. १३ ते १८ जानेवारी, २०२० या कालावधीत एका दिवसाचे प्रशिक्षण आयोजित केले आहे. सदर प्रशिक्षणाच्या अनुषंगाने दि. १० जानेवारी, २०२० रोजी श्री. सतिश सुपे, सह सचिव (अनापुग्रासंवि) यांचे मंत्रालयातील दालन क्र. २२१, दुसरा मजला, मंत्रालय विस्तार, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग येथे दुपारी १२.०० वाजता बैठक आयोजित केली आहे. तरी आपणास विनंती की, सदर बैठकीसाठी आपल्या विभागातील एका अधिका-यास उपस्थित राहण्याच्या सूचना देण्यात याव्यात.

आपला

( दीपक केंद्रे )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,
श्री.सतिश सुपे, सह सचिव (अनापुग्रासंवि) यांचे स्वीय सहायक.

गरीब व गरजू व्यक्तिंना स्वस्त दरात "शिवभोजन" उपलब्ध करुन देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग
शासन परिपत्रक क्रमांक - शाभोथा-२०१९/प्र.क्र.५१/नापु-१७
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक- ०६ जानेवारी, २०२०

वाचा :-शासन निर्णय क्रमांक - शाभोथा-२०१९/प्र.क्र.५१/नापु-१७, दि. ०१ जानेवारी, २०२०

प्रस्तावना:-

राज्यातील गरीब व गरजू जनतेला सवलतीच्या दरात शिवभोजन उपलब्ध करुन देण्यासाठी या विभागाने दि. ०१ जानेवारी, २०२० रोजी शासन निर्णय निर्गमित केलेला आहे. सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी सुरळीतपणे करण्यासाठी तसेच सदर योजना दिनांक २६ जानेवारी २०२० रोजीपासून अंमलात आणण्याकरिता पुढीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

परिपत्रक :-

या योजनेची पूर्वतयारी करण्यासाठी वेळापत्रक पुढीलप्रमाणे राहील:-

| कालावधी | कार्यपद्धती |
|---|---|
| दि. ६ ते दि.१० जानेवारी, २०२० (भोजनालयांची निवड करणे) | जिल्हा पुरवठा अधिकारी/ अन्नधान्य वितरण अधिकारी/ उपनियंत्रक शिधावाटप यांनी पाठविलेल्या भोजनालयांच्या प्रस्तावावर जिल्हाधिकारी/ नियंत्रक शिधावाटप व संचालक यांचे अध्यक्षतेखाली समितीने सक्षम भोजनालयांची निवड करुन शासनास कळविणे. |
| दि. १३ ते १८ जानेवारी, २०२० (भोजनालयचालकांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम) | अन्न व औषध प्रशासन, स्थानिक नगरपालिका/ महानगरपालिका/ सार्वजनिक आरोग्य विभाग/ गृहविज्ञान/ तंत्रनिकेतन/ हॉटेल मॅनेजमेंट यांनी खाली नमूद केलेल्या बाबींसाठी प्रशिक्षण आयोजित करावे. तसेच सदर भोजनालय चालविण्यासाठी आवश्यक असलेल्या शासकीय/ |

| | |
|---|---|
| | निमशासकीय यंत्रणांचे परवान्याबाबत भोजनालय चालकास अवगत करावे व याबाबत सर्व बाबींची पूर्तता करवून घ्यावी. |
| दि.२० ते २४ जानेवारी, २०२० | सदर योजनेचा प्रारंभ दि.२६ जानेवारी, २०२० रोजी करण्याच्या अनुषंगाने स्थानिक समितीने सर्व पुर्वतयारी करून घ्यावी तसेच सदर भोजनालय चालकांनी आवश्यक असलेले शासकीय/ निमशासकीय यंत्रणांचे परवाने प्राप्त करुन घेतले आहेत याची खात्री करून कार्यारंभ आदेश द्यावेत. दि.२६ जानेवारी, २०२० पासून सदर योजनेची अंमलबजावणी होईल याची दक्षता घ्यावी. |

<u>प्रशिक्षण कार्यक्रम</u> :-

१. अन्न व औषध प्रशासन विभागातील अधिकाऱ्यांनी अन्नाचा दर्जा उत्तम राखण्यासाठी, अन्न भेसळ रोखण्यासाठी तसेच सदर शिवभोजन थाळी बनवण्यासाठी बाजारातून लागणारे साहित्य / सामग्री घेताना सदरील अन्नघटक खाण्यायोग्य असल्याबाबत करावयाच्या खात्री संदर्भाने प्रशिक्षण देणे.

२. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांनी पोषक तत्वे असलेल्या भाज्यांची निवड करण्याबाबत प्रशिक्षण द्यावे तसेच ग्राहकाच्या आरोग्याच्या हितकारक बाबींविषयी भोजनालय चालकास मार्गदर्शन करावे.

३. स्थानिक महानगरपालिका / नगर पालिका अधिकाऱ्यांनी ओला व सुका कचरा वेगळा करणे, भोजनालय परिसरात डास, कीटक इत्यादी उपद्रवकारक किटाणूची वाढ न होऊन परिसर स्वच्छ ठेवण्याबाबत मार्गदर्शन करावे.

४. गृह विज्ञान/ हॉटेल मॅनेजमेंट/ तंत्रनिकेतन विद्यालय/ औदयोगिक प्रशिक्षण संस्थेतील प्राध्यापकांना रुचकर, स्वच्छ स्वयंपाक बनविण्याच्या अनुषंगाने स्थानिक समित्यांनी प्रशिक्षणासाठी निमंत्रित करून भोजनालय चालकांसाठी प्रशिक्षण आयोजित करावे.

५. प्रशिक्षणावेळी सदर भोजनालय चालविण्यासाठी आवश्यक असलेल्या शासकीय/ निमशासकीय यंत्रणांचे परवान्याबाबत भोजनालय चालकास अवगत करावे व याबाबत सर्व बाबींची पूर्तता करवून घ्यावी.

* शिवभोजन देणाऱ्या भोजनालयांवर नियंत्रण ठेवण्यासाठी विविध अधिकाऱ्यांच्या जबाबदाऱ्या :-

१. जिल्हाधिकारी/ नियंत्रक शिधावाटप व संचालक यांनी महिन्यातून एकदा काही भोजनालयांना भेटी देऊन आढावा घ्यावा व त्याबाबतचा अहवाल शासनास विनाविलंब सादर करावा. तसेच ही योजना राबविण्यासाठी असलेल्या यंत्रणेतील अधिकारी/ कर्मचारी यांनी केलेल्या कामाचाही आढावा घ्यावा.

२. जिल्हा पुरवठा अधिकारी/ अन्नधान्य वितरण अधिकारी/ उपनियंत्रक यांनी पंधरा दिवसातून एकदा या भोजनालयांना भेटी देऊन आढावा घ्यावा व त्याबाबतचा अहवाल जिल्हाधिकारी/ नियंत्रक शिधावाटप व संचालक यांना सादर करावा. तसेच ही योजना राबविण्यासाठी असलेल्या यंत्रणेतील अधिकारी/ कर्मचारी यांनी केलेल्या कामाचाही आढावा घ्यावा.

३. शिधावाटप अधिकारी/पुरवठा निरीक्षण अधिकारी यांनी आठवड्यातून एकदा या भोजनालयांना भेटी देऊन आढावा घ्यावा व त्याबाबतचा अहवाल जिल्हा पुरवठा अधिकारी यांना विनाविलंब सादर करावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(दीपक कैथे)
अवर सचिव

प्रति,

१. सर्व विभागीय आयुक्त
२. सर्व जिल्हाधिकारी
३. नियंत्रक, शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा, मुंबई
४. वित्तिय सल्लागार व उपसचिव (अ.ना.पु. व ग्रा.सं) पुरवठा आयुक्तांचे कार्यालय, मुंबई
५. उपसंचालक, नागरी पुरवठा, पुरवठा आयुक्त कार्यालय मुंबई
६. सर्व जिल्हा पुरवठा अधिकारी/ सर्व उपनियंत्रक शिधावाटप, मुंबई
७. सर्व अन्नधान्य वितरण अधिकारी
८. निवड नस्ती, नापु-१७.

महाराष्ट्र शासन

दुरध्वनी क्र. ०२२-२२७९३१६५
E-mail: sudhir.shetty@nic.in

क्र. संकीर्ण-१११२०/प्र.क्र.१४/२०/तांशि-७
उच्च व तंत्रशिक्षण विभाग,
दालन क्र. ४४१, ४था मजला, विस्तार इमारत,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १० जानेवारी, २०२०.

प्रति,
संचालक,
तंत्र शिक्षण संचालनालय,
मुंबई.

विषय : गरीब व गरजु व्यक्तींना स्वस्त दरात शिवभोजन उपलब्ध करुन देण्याबाबत.
संदर्भ : अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांचे शासन निर्णय क्र. शाभोथा-२०१९/प्र.क्र.५१/नापु-१७, दि.०१/०१/२०२० व ०६/०१/२०२०.

राज्यातील गरीब व गरजू जनतेला सवलतीच्या दरात शिवभोजन उपलब्ध करुन देण्याची योजना शासनाकडून सुरु करण्यात आली आहे. या अनुषंगाने पहिल्या टप्प्यात प्रायोगिक तत्वावर तिमाहीसाठी राज्यातील प्रत्येक जिल्हयाच्या मुख्यालयी किमान एक भोजनालय सुरु करण्यात येणार आहे. तद्नंतर सदरील योजनेस मिळणारा प्रतिसाद पाहून ही योजना इतर भागात राबविण्यात येणार आहे. याअनुषंगाने अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाने संदर्भाधिन शासन निर्णय निर्गमित केले आहेत. (प्रत सोबत जोडली आहे.)

०३. उपरोक्त योजना सुरळीतपणे राबविण्यासाठी व योजना २६ जानेवारी, २०२० पासून अंमलात आणण्यासाठी या विभागाच्या अधिपत्याखालील हॉटेल मॅनेजमेंट या संस्थेतील प्राध्यापकांना रुचकर, स्वच्छ स्वयंपाक बनविण्याच्या अनुषंगाने स्थानिक समित्यांनी प्रशिक्षणासाठी निमंत्रित केलेल्या भोजनालय चालकांसाठी प्रशिक्षण आयोजित करण्याचे कार्य नेमूण देण्यात आले आहे.

तरी, तंत्रशिक्षण विभागाच्या अधिपत्याखालील शासकीय/अनुदानित व विनाअनुदानित हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड कॅटरिंग टेक्नॉलॉजी संस्थांकडून असे प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्याच्या अनुषंगाने सदर संस्थांनी संबंधित जिल्हयाच्या जिल्हा पुरवठा अधिकारी किंवा अन्नधान्य वितरण अधिकारी यांना संपर्क साधून प्रशिक्षण कार्यक्रमाची रुपरेषा ठरविण्याबाबत आपल्या स्तरावरुन निर्देश देण्यात यावे. सदर प्रशिक्षण कार्यक्रमाचा कालावधी दि.१३/०१/२०२० ते दि.१८/०१/२०२० असा असल्याने त्यावर तात्काळ कार्यवाही करुन अनुपालन अहवाल शासनास सादर करण्यात यावा.

(सुधीर ज. शेट्टी)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत : सह सचिव, (कार्या. नापू-१७) अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.